MHBI160010932021

**नि.दि.दावा क्र.५३१/२०२१**
**त्रिंबक वि. कचरु**

**आदेश नि.११ वर**

प्रस्तुतचा अर्ज वादी/अर्जदारातर्फे सी.पी.सी.चे ऑर्डर २६ रूल ९ सह कलम १५१ प्रमाणे कोर्ट कमिशनर नेमणुकीबाबत देण्यात आलेला आहे. प्रतिवादीने सदर अर्जास आपले म्हणणे अर्जाच्या पाठीमागे नोंदवून त्यास हरकत नोंदवली.

२. अर्जदाराचे कथन आहे की, प्रतिवादीने वादीच्या वादग्रस्त मिळकतीमधील पश्चिम बाजूने दक्षिणोत्तर ६० आर. क्षेत्रावर बेकायदेशिरपणे अतिक्रमण केलेले असून तो सदर क्षेत्राचा उपभोग घेत आहे. त्यामुळे त्यांच्या मध्ये वाद निर्माण झालेला आहे. त्यामुळे वादग्रस्त मिळकतीची मोजणी होणे आवश्यक आहे. म्हणून मा. तालुका निरीक्षक भूमि अभिलेख यांच्याकडून वादीचे क्षेत्राची मोजणी करुन हददीखुणा निश्चीत केल्यास वादी व प्रतिवादी यांच्यामधील तिढा सुटेल व सदर प्रकरणामध्ये गुंतागुंत निर्माण होणार नाही. त्यामुळे वादग्रस्त जमीनीची मोजणी करुन गटाच्या हददीखुणा निश्चीत करुन किती अतिक्रमणीत क्षेत्र आहे हे दाखवून अहवाल हा मा. कोर्टात मागवणे न्यायाच्या दृष्टीने योग्य व जरुरी आहे. त्यामुळे अर्जदाराने त्याचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. विरुध्द बाजूने प्रतिवादीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन फक्त हरकत आहे असे कथन केले.

४. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादीतर्फे त्यांच्या वकीलांनी युक्तीवाद केला. युक्तिवादानंतर माझे विचाराधीन आलेले मुददे व त्यावरील माझे निष्कर्ष विवेचनासह खालीलप्रमाणे आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दोन्ही पक्षकारांमधील वादाचे निराकरण करणेसाठी कोर्ट निरीक्षकाची नेमणूक करणे आवश्यक असल्याचे सिध्द होते काय? | होय |
| २. | काय आदेश? | अंतिम आदेशान्वये |

## <u>का र ण मि मां सा</u>

**मुद्या क्र. १ करिता**

५. वादीचा दावा व अर्ज वाचला. वादीने प्रस्तुतचा दावा हा अतिक्रमण हटवून स्वतंत्र ताबा मिळणेबाबत व अतिक्रमीत क्षेत्राचे दरम्यानचे उत्पन्न मिळणेसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी हा हजर झालेला आहे. परंतु त्यांनी लेखी कैफियत दाखल केलेली नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द प्रस्तुतचा दावा हा विनालेखी कैफियत चालवणेबाबत नि.१ वर आदेश पारीत केलेला आहे.

६. वादीने दाव्यातील कलम नं.५ मध्ये नमूद केले आहे की, प्रतिवादीने वादग्रस्त मिळकतीवरील वादीचे कापसाचे पीक उपटून पश्चिम बाजूने दक्षिणोत्तर ६० आर. क्षेत्रावर अतिक्रमण करुन त्यावर बाजरीचे पीक पेरलेले आहे. प्रतिवादी हा या दाव्यात हजर झालेला आहे. त्यामुळे त्यांना वादीच्या वाद कथनाची माहिती आहे हे स्पष्ट होते. असे असताना देखील प्रतिवादीने वादीच्या दाव्यास लेखी कैफियत ही दिलेली नाही. प्रतिवादीने वादीच्या दाव्यातील कथन हे लेखी कैफियत दाखल करुन अमान्य केलेले नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्जास जरी प्रतिवादी यांनी म्हणणे

दाखल केले असले तरी ते म्हणणे No pleading no proof या तत्वावर विचारात घेणे योग्य होणार नाही.

७. अर्जदाराचे कथन आहे की, त्यांना गट नं.२७७ मध्ये १ हे.६४ आर. जमीन आहे. वादीने नि.४ सोबत गट नं.२७७ चा ७/१२ उतारा दाखल केलेला आहे. त्यावरुन वादीच्या नावे गट नं.२७७ मध्ये १ हे.६४ आर. जमीन असल्याबाबत प्रथमदर्शनी दिसून येत आहे. वादीने प्रस्तुतचा दावा हा अतिक्रमण हटवून ताबा मिळणेबाबतही दाखल केलेला आहे. त्यामुळे वादी कथीत वादीच्या जमीनीच्या मोजणी केल्यास प्रतिवादीचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही. जर वादी कथीतप्रमाणे मोजणी झाल्यास वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद पूर्णपणे संपुष्टात आणण्यासाठी त्याची न्यायालयास मदतच होईल. त्यामुळे वादीने केलेली मागणी मंजूर केल्यास वादी व प्रतिवादी यांच्यामधील वादाचे निराकरण करण्यासाठी कोर्ट निरीक्षकाची नेमणूक करणे योग्य होईल. म्हणून मी मुददा क्र.१ चे उत्तर होकारार्थी नोंदवून मुददा क्र.२ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. तालुका उपअधिक्षक, भुमी अभिलेख, शिरुरकासार यांची मौजे बडेवाडी तहत मानूर, ता. शिरुरकासार, जि. बीड येथील वादग्रस्त मिळकत जमीन गट क्र.२७७ एकूण क्षेत्र ११हे.४४आर. पैकी वादीचे क्षेत्र १हे.६४आर. क्षेत्राची मोजणी करण्यासाठी कोर्ट कमिशनर म्हणुन नेमणूक करण्यात येते.

३. तालुका उपअधिक्षक, भुमी अभिलेख, शिरुरकासार यांनी सदर अर्जात नमूदप्रमाणे मोजणी करुन त्याचा मोजणी अहवाल दोन महिन्याच्या आत सादर करावा.

४. अर्जदाराने कोर्ट निरीक्षकाची मोजणी फीस तालुका उपअधिक्षक, भुमी अभिलेख, शिरुरकासार यांचे कार्यालयात आजपासून १५ दिवसाच्या आत भरावी.

५. अर्जदाराने कोर्ट निरीक्षकास वादग्रस्त जमीनीबाबत मोजणीकामी आवश्यक ती सर्व कागदपत्रे दयावी.

६. अर्जदाराने प्रस्तुत दाव्याची व अर्जाची प्रमाणित प्रत ही कोर्ट निरीक्षकास मोजणी आधी दयावी.

७. तालुका उपअधिक्षक, भुमी अभिलेख, शिरुरकासार यांना मोजणीबाबत रिट पाठवावे.

८. वादी व प्रतिवादींनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Digitally signed by AMITKUMAR TRIMBAKRAO MANGIRE
Date: 2023.03.09 17:15:21 +0530

(अ.त्रिं.मनगिरे)
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
शिरुरकासार.

दिनांक ०९/०३/२०२३

“I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order”.

Sd/-
[P.B. Kusumkar]
Stenographer Grade-3

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 09/03/2023 |
| Transcribed on | : | 09/03/2023 |
| Checked & signed on | : | 09/03/2023 |